४४

शिक्षक शिक्षण आणि गुणवत्ता व्यवस्थापन

पाटील वैशाली रमेश
प्रभारी प्राचार्या, शाहू शिक्षण संस्था अध्यापक
महाविद्यालय, शहाड, कल्याण.

सारांश :

मनुष्याच्या अस्तित्वापूर्वीपासून परिवर्तन प्रक्रिया अविरतपणे सुरू आहे. आजच्या वेगवान युगात परिवर्तनाचा वेग वाढलेला दिसतो. परिवर्तन ही अनिवार्य अट आहे. काळानुरूप आपण बदल केला नाही. तर कदाचित अस्तित्वच धोक्यात येईल. शिक्षणक्षेत्रही त्यास अपवाद नाही. समाजाच्या गरजा अणि अपेक्षा लक्षात घेऊन शिक्षणातही वेळोवेळी बदल झालेले आहेत. शिक्षण हा बदलत्या समाज जीवनाचा आरसा आहे. २१व्या शतकातील आव्हाने सक्षमपणे पेलण्यासाठी शिक्षण क्षेत्रामध्ये व्यवस्थापनास अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे व्यवस्थापनात नवनवीन संकल्पनांचा उगम होतो आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण, शहरीकरण, बाजारीकरण यामुळे ज्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यांना समर्थपणे तोंड देण्यासाठी शिक्षक शिक्षण आणि समग्र गुणवत्तेचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. विकसित राष्ट्रांमधून TQM ची अंमलबजावणी होत असून त्यांचे निष्कर्षही चांगले आहेत. मानवी जीवनात गुणवत्ता पाहिजे असेल तर शिक्षणात गुणवत्तेची निर्मिती केली पाहिजे. फक्त निर्मिती (Creation) पुरेशी नसून याचसोबत विकास, जपणूक/संगोपन करणे गरजेचे आहे. राष्ट्राचा विकास, समाजाचा विकास हा शिक्षणाच्या स्वरूपावर अवलंबून असतो. शिक्षणाची प्रगती व प्रतिष्ठा शिक्षण देणाऱ्या शिक्षकांवर अवलंबून आहे. अशा या शिक्षकाची जबाबदारी फार मोठी असते. शिक्षकी पेशा हा सेवाव्रतावर आधारित आहे. सेवाव्रतावर विश्वास असणारे विकसनशील देशाला विकसित होण्यास फार मोठी मदत करतात. आज शिक्षकांची जबाबदारी पूर्वीच्या शिक्षकापेक्षा अनेक पटींनी वाढली आहे.

आज शिक्षणाची गुणवत्ता टिकविण्यासाठी राष्ट्र, समाज व व्यक्तिचा विकास व्हायला पाहिजे. त्यासाठी शिक्षण शिक्षणाच्या व गुणवत्ता व्यवस्थापनाचा स्विकार होणे गरजेचे आहे.

महत्वाचे मुद्दे :—

शिक्षण, शिक्षक, शिक्षक शिक्षण, गुणवत्ता, व्यवस्थापन, समग्र गुणवत्ता व्यवस्थापन अर्थ व व्याख्या.

Scanned with OKEN Scanner

प्रास्ताविक :

समाजाच्या सर्वच क्षेत्रात बदल होत असतात पण शिक्षण क्षेत्रातील बदल हा मूलगामी आणि दिर्घकालीन परिणाम करणारा ठरतो. कारण समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि उद्याच्या होणाऱ्या नागरिकांसाठी अभ्यासक्रमात बदल केले जातात. आजचा विद्यार्थी हा संशोधक तर आहेत. शिवाय माहितीचा प्रचंड साठाही त्याच्याजवळ आहे. त्यामुळे चाकोरीबध्द अभ्याक्रम आणि ठराविक अध्ययन अनुभव या बालकांना देणे पुरेसे नाही. या बालकांची माहीतीची भूक त्यांना स्वस्थ बसू देत नाही. या बालकांची माहितीची भूक त्यांना स्वस्थ बसू देत नाही. ''Nothing is sufficient, everything is necessary'' या शब्दात आजच्या विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेचे वर्णन करतात येईल. मग अशा बालकांना ज्ञानाने तृप्त करण्याची प्रमुख जबाबदारी शिक्षणावरच येते. आईवडीलानंतर ज्ञानदान करण्याचे काम, विद्यार्थी घडविण्याचे काम हे प्रामुख्याने शिक्षक करत असतात.

सद्यपरिस्थितीत शिक्षकांचा सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी बदलत्या अभ्यासक्रमातील नवाविचार प्रवाहानुसार स्वत:चे अध्यापन कार्य शिक्षकांना बदलणे गरजेचे आहे. शिक्षकांचे गुणवत्तापूर्ण अध्यापन कार्य घडविण्यात शिक्षक शिक्षणाचा सिंहाचा वाटा असतो. पारंपारिक शिक्षण पध्दतीपेक्षा तंत्रविज्ञानाचा पाया असलेले दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व्यवस्थापन घडविण्याचे कार्य शिक्षक शिक्षणावर तसेच प्रशिक्षण संस्थावर आहे. शिक्षणाच्या पूनर्रचनेत सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक होय.

शिक्षक शिक्षण व्याख्या :

- ''शिक्षक शिक्षण म्हणजे औपचारिक व अनौपचारिक कृती व अनुभवांचा साठा जो व्यक्तिला अर्हता प्राप्त करण्यास, व्यवसायिक जबाबदारी ओळखण्यास मदत करतो.''
- ''शिक्षकांची समाजनिष्ठा व्यवसायनिष्ठा, विद्यार्थीनिष्ठा या बाबतीत गुणसमुच्चय वाढीस लावण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षक शिक्षण होय.''

गुणवत्ता संकल्पना :

- आदर्श निर्माण करणाऱ्या इतिहासाच्या पानावर आपली मुद्रा उमटवणे म्हणजे गुणवत्ता होय. गुणवत्ता या इंग्रजीतील Quality या शब्दाला पर्यायी शब्द वापरला असून शब्दकोशात त्याचा अर्थ गुण, जात, प्रकार, दर्जा आणि विशेष धर्म हे शब्द वापरलेले आहेत.
- ''कृतिशीलतेद्वारे मानवी मूल्यांना आपल्या कृतीद्वारे सार्थ ठरविणाऱ्या कर्तृत्वाची परंपरा म्हणजे गुणवत्ता होय.''

व्यवस्थापन :

हेली फेयॉल—व्यवस्थापन करणे म्हणजे भविष्याबद्दल अंदाज बांधणे, नियोजन करणे, संघटना उभारणे, आदेश देणे, समन्वय साधणे आणि नियंत्रण ठेवणे होय. तसेच त्यांनी व्यवस्थापन हे शास्त्र असल्याचे म्हटले आहे.

Scanned with OKEN Scanner

समग्र गुणवत्ता व्यवस्थापन– व्याख्या व अर्थ –

"Total Quality Management means that the organizations culture is defined by and supports the constant attainment of customer satisfaction through an integrated system of tools, techniques & training. This involves the continuous improvement of organizational process, resulting in high quality products & services."

"TQM is a comprehensive philosophy of living & working in organisations emphasizing the relentless pursuit of continuous improvement."

एकूणच TQM ही कार्य प्रक्रियांत सतत सुधारणा घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करण्यावर भर देणारी एक व्यापक विचारसरणी आहे. गुणवत्ता हा तिचा केंद्रबिंदू आहे. गुणवततेची व्याख्या करणे कठीण असले तरी त्यात अभिप्रेत असलेले घटक पुढीलप्रमाणे नमूद करता येतील.

ग्राहकांच्या गरजांची पूर्ती अपेक्षित आणि त्याहून ही अधिक प्रमाणात गरजांची पूर्ती अंतर्भूत असते.

१) संस्थेत काम करण्याच्या प्रत्येकाची जबाबदारी, २)अविरत सुधारणा, ३) सक्षम नेतृत्व, ४) मानवी संसाधनाचा विकास, ५) उत्कृष्ट कामगिरीची दखल आणि दार, ६) गट कार्य, ७) मापन, ८) तणावमुक्त वातावरण ९) समस्यांचे पध्दतशीर निरसन

वरील सर्व घटक Deming यांनी औद्योगिक क्षेत्रासाठी सुरूवातीस वापरले.

TQM दोन उद्दिष्टे :

१) गुणवत्ता उत्पादने आणि सेवा यांच्या माध्यमातुन ग्राहकांचे पूर्णत: समाधान करणे.

२) (अविरत सुधारणा) गुणवत्तेसंदर्भात अविरत सुधारणा

१) **Counting** (मोजमाप)—गुणवत्ते संदर्भात ज्या समस्या निर्माण होतील त्यांचे विश्लेषण करणे, समजावुन घेणे व त्या सोडविण्यासाठी आवश्यक साधने, तंत्रे व प्रशिक्षणाचा वापर करणे.

२) **Customers** (ग्राहक)— **Quality for the customer as a driving force & central concern.**

३) **Culture**—संस्कृती—गृणवत्तेसाठी आवश्यक नेतृत्व, श्रध्दा, मूल्ये यांच्या माध्यमातून तयार झालेली संस्कृती असते.

समग्र गुणवत्ता व्यवस्थापनाची तत्वे / स्तंभ –

John Jay Bosting यांनी "The Quality Revolution in Education" या लेखामध्ये TQM चे चार स्तंभ दिलेले आहेत–

a. Synergetic Relationship (समृध्द संबंध) : शाळा, शिक्षक हे परिणामकारक अध्ययनासाठी साधने, तंत्रे, वातावरण, प्रणाली पुरवित असतात. थोडक्यात, व्यवस्थापनांत समाविष्ट असणाऱ्या प्रत्येक घटकांच्या हुशारीचा तसेच त्यांच्या कामगिरीचा फायदा घेऊन त्याचे रूपांतर समूह उर्जेमध्ये करावे लागते.

Scanned with OKEN Scanner

b. **Continuous Improvement & Self Evolution** (अविरत सुधारणा आणि स्वयं मुल्यमापन) : यामध्ये विद्यार्थी क्षमता, अध्ययनार्थीची अध्ययन शैली यांचा सुयोग्य वापर होण्याच्या दृष्टीने प्रत्येक घटकाने अविरत सुधारणेसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

c. **A System of ongoing process** (चालू प्रक्रियेची एक प्रणाली) : प्रणालीमध्ये समाविष्ट असणाऱ्या वैयक्तिक घटकाला (उदा.शिक्षक, विद्यार्थी) यांना दोषी न ठरविता ते पूर्ण प्रणालीचे अपयश आहे असे समजून पूर्ण प्रणालीने मिळून ही प्रणाली कार्यान्वीत करणे गरजेचे असते.

d. **Leadership (Responsibility of Top Management)** :(नेतृत्व– उच्च व्यवस्थापनाची जबाबदारी) हे सर्व करण्यासाठी समक्ष नेतृत्वाची गरज असते. विद्यार्थ्यांचे नेतृत्व शिक्षकांनी तर शिक्षकांचे नेतृत्व मुख्याध्यापकाने करावे.

TQM साठी अत्यावश्यक असणाऱ्या बाबी

१. प्रत्येकाची बांधीलकी व जाणीव २. स्पष्ट उद्दिष्ट ३. प्रणाली दृष्टीकोन, ४. प्रभुत्व अध्ययनावर भर, ३.५.विद्यार्थी विकास, ६. मानवतावादी दृष्टीकोनातून अध्ययन वातावरण निर्मिती

शिक्षणामध्ये TQM ची गरज व महत्त्व

१. शिक्षण ही एक खाजगी वस्तू बनली आहे. २. शिक्षणाचे जागतिकीकरण. ३. गुणवत्तेची घसरण आणि संख्यात्मक वाढ. ४. कोचिंग क्लासेसची वाढ. ५. उत्पादनांवरती विश्वास नाही. ६. विद्यार्थी स्थलांतर. ७. शिक्षणाचे उत्तरदायित्व कमी. ८. जहाल आतंकवाद. ९. माहिती तंत्रज्ञानामुळे जग परिवर्तनीय झाले. १०. शिक्षणपध्दतीमधील दोष. ११. शिक्षणपध्दतीवरील प्रभाव/बदल. इ. मुद्दयांमुळे शिक्षणक्षेत्रांत प्रभावी समग्र गुणवत्ता व्यवस्थापनाची गरज वाटते.

शिक्षणात समग्र गुणवत्ता व्यवस्थापनासाठीच्या पायऱ्या (Stages)

शिक्षणांमध्ये समग्र गुणवत्ता व्यवस्थापन करावयाचे असेल तर वरील ७ पायऱ्यांचा समावेश असणे महत्त्वाचे आहे.

१. नियोजन (Planning)

शिक्षणाच्या व्यवस्थापनामध्ये सुरूवातीची पायरी म्हणजे सुसूत्र पध्दतीने केलेले नियोजन होय. उदा. वार्षिक नियोजन, मासिक नियोजन, वेळापत्रके इ.

२. चिंतन (Thinking)

नियोजनानंतर त्यावर सामूहिक चिंतन किंवा विचार करणे गरजेचे आहे विचारांनी कार्यवाहीची दिशा पक्की होते.

३. कार्यवाही (Execution)

प्रत्यक्ष कार्यवाहीला या ठिकाणी सुरूवात होते. यामध्ये नेतृत्व, वारंवार मार्गदर्शन, प्रेरणा इ. चा अंतर्भाव होतो.

Scanned with OKEN Scanner

४. सेवेचा दर्जा उच्च (Confirmity in Status)

शिक्षण ही एक सेवा आहे. त्यामुळे नियोजनाची कार्यवाही करत असतांना दर्जाशी जडजोड होता कामा नये. विद्यार्थ्याला उच्चतम दर्जाची सेवा मिळणे गरजेचे असते.

५. गुणवत्ता संवर्धन व संगोपन (Quality Maintainance)

जी गुणवत्ता निर्माण केली आहे. तिचा सातत्याने विकास घडवून तिचे संगोपन करणे व पर्यायाने ती टिकवून ठेवणे या पायरीमध्ये अभिप्रेत आहे.

६. त्रुटी शून्यता (Zero Defect)

जे उत्पादन किंवा सेवा आपण देणार आहोत. त्यामध्ये कोणतीही त्रुटी, उणीव, दोष असता कामा नये तर त्यातून ग्राहकांचे पूर्ण समाधान अपेक्षित असते.

७. मानक (Standardization)

एखादे उत्पादन व सेवा उत्तमोत्तम बनविणे व ती टिकवून ठेवणे, तिचा दर्जा टिकवणे गरजेचे आहे. स्पर्धेमध्ये आपण कुठे कमी पडत नाही ना याची खात्रीही करून घेणे आवश्यक असते. उदा तंत्रज्ञानाचा वापर, आधुनीक अध्यापन पध्दतीचा वापर इ.

संदर्भ पुस्तक (ग्रंथ) सूची –

१) डॉ. जगताप ह.ना. (२००७) शैक्षणिक मानसशास्त्र संपादित आवृत्ती; नरेंद्र प्रकाशन (पुणे–२)

२) डॉ. चंद्रकांत मोरे, डॉ. सदानंद भिलेगावकर (२००९)
'शिक्षक शिक्षण', नित्य नूतन प्रकाशन, नारायण पेठ, पुणे–३०

३) डॉ. शिवाजी सागर, प्रा. अशोक कोरे, 'शैक्षणिक व्यवस्थापन' सुविचार प्रकाशन मंडळ पुणे.

४) प्रा. अरूण सांगोलकर, नवीन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह इनसाईट प्रकाशन (२०१०) इनसाईट पब्लिकेशन्स, नाशिक.

५) प्रा.श्री. तांबे संदिप कडूभाऊ, शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता शिक्षणातील मर्मदृष्टी (डिसेंबर २०१३) इनसाईट पब्लिकेशन्स, नाशिक.

•••

Scanned with OKEN Scanner

REG.NO. : MAHBIL/2012/54586 UGC Approval No. 63299 ISSN: 2319-5525

संशोधन चेतना
SANSHODHAN CHETANA

VOL: 7th, SPECIAL ISSUE, ENGLISH-MARATHI, QUARTERLY : 13th Oct. 2018

Special Issue on "Teacher Education : Status & Future Challenges"

संपादक डॉ. सुनिता मगरे

Scanned with OKEN Scanner